Ref No.: GGD/Sec./2022/06/1
Date: June 1, 2022

BSE Scrip Code: **505250**

To
Corporate Relationship Department
BSE Limited
1st Floor, P. J. Towers
Dalal Street, Fort,
Mumbai - 400 001

Dear Sir/Madam,

**Subject: Copy of Standalone and Consolidated Audited Financial Results for the quarter and year ended 31st March 2022 published in Newspapers**

Please find enclosed a copy of Standalone and Consolidated Audited Financial Results for the quarter and year ended 31st March 2022 published in The Free Press Journal (English) and Mahasagar (Marathi).

You are requested to take the same on your records.

Thanking You
Yours Faithfully,

For **G. G. Dandekar Machine Works Limited**

Sayalee Yengul
**Company Secretary & Compliance Officer**

Encl**:** As above




कमीशन व मार्जिन वाढविण्याची मागणी घेऊन पेट्रोल-डीझेल पंप डीलर्सनी मंगळवारी एकदिवसीय खरेदी बंद आंदोलन पुकारले होते. यामुळे शहरातील बहुतांश पेट्रोल पंपवर असा शुकशुकाट होता. या आंदोलनात राज्यातील ६५०० डीलर्स सहभागी झाले होते.

# नवजात बालिकेची 3 लाखात विक्री

## पोलिसांची सापळा रचून ८ आरोपींना अटक

नागपूर, क्राईम रिपोर्टर. गुन्हे शाखेच्या मानवी तस्करी विरोधी पथकाने नवजात बालिकेची विक्री करणाऱ्या ८ लोकांना सापळा रचून अटक केली. मुलीच्या खरेदी-विक्रीत एक डॉक्टर आणि मुलीच्या आई-वडिलांचाहीसमावेश आहे. अटकेतील आरोपी हिवंका उर्फ वर्षा फत्तूलाल मेश्राम (५२) रा. लष्करीबाग, रत्ना धर्मेंद्र भालाधरे (३३) रा. झाडे चौक, बस्तरवाडी, विपिन सिद्धार्थ उके (३४) रा. कोहळे लेआऊट, खडगाव रोड, सीमा तुलसीदास पित्रोदा (४८) रा. मिनीमातानगर, अमोल उर्फ ज्योतिपाल सिद्धार्थ रंगारी (३३) रा. बंसीनगर, भांडेवाडी, मंगला मोहन तांबे (५३) रा. नवा नकाशा, लष्करीबाग, सिंड्रेला उर्फ नेहा मोहनसिंग सहगल उर्फ सिंड्रेला मुकूल वासनिक (२१) रा. काश्मिरी गल्ली, पाचपावली, मुकूल सुरेश वासनिक (२२) रा. बोरकर लेआऊट, निर्मल कॉलोनी आणि डॉ. कल्याणी डेविड थॉमस (४८) रा. हिवरीनगर आहेत.

### शिक्षणासाठी बाळ नको होते

सिंड्रेला आणि मुकूल यांनी जवळपास एक वर्षापूर्वी प्रेम विवाह केला होता. या दरम्यान ती गर्भवती झाली. कमी वयात तिला आई व्हायचे नव्हते. तिची पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून नोकरी करायची इच्छा होती. मात्र सुरुवातीला तिला गर्भवती असल्याचे समजलेच नाही. डॉ. कल्याणीशी संपर्क केल्यावर ती गर्भवती असल्याचे समजले, मात्र तोपर्यंत ५ महिने लोटले होते. त्यामुळे गर्भपात करणे शक्य नव्हते. डॉक्टरने तिला बाळाला जन्म देण्यास सांगितले. परंतु, तिला बाळ नको होता. यामुळे डॉक्टरने बाळाला जन्म दिल्यानंतर त्याला कोणाला तरी देऊन देऊ असा उपाय सुचविला. आता बाळ कोण घेईल अशी समस्या निर्माण झाली. एक-एककरून आरोपी जुडत गेले आणि बाळाची विक्री करून पैसे कमावण्याची योजना बनविण्यात आली. सर्वांचे कमीशन ठरले होते.

### पोलिसांनी रचला सापळा

या दरम्यान मानव तस्करी विरोधी पथकाच्या पोलिस निरीक्षक नंदा मनगटे यांना काही लोक नवजात बाळाची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून मानव तस्करी करणारी ही टोळी पकडण्याची योजना बनविण्यात आली. सामाजिक कार्यकर्त्यांना बनावट ग्राहक बनविण्यात आले. ३ लाख रुपयात सौदा ठरला. कागदाचे बंडल तयार करण्यात आले. सोमवारी दुपारी पोलिस पथकाने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ सापळा रचला. वर्षा मेश्राम ५ दिवसांची मुलगी घेऊन तेथे पोहोचली. मुलगी सोपवून पैसे घेताच पोलिसांनी तिला पकडले. आई-वडील आणि डॉक्टर वगळता इतर आरोपीही जवळच उभे होते. पोलिसांनी त्यांनाही अटक केली. चौकशीत डॉ. कल्याणी आणि मुलीची आई सिंड्रेला आणि वडील मुकूलची माहिती मिळाली. विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून सर्व आरोपींना सदर पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

### ७ दिवसांची पोलिस कोठडी

मंगळवारी पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले. बाळाचा जन्म केव्हा आणि कुठे झाला. या प्रकरणात आणखी किती लोक सहभागी आहेत. कोणाची काय भूमिका होती आदी मुद्द्यांवर पोलिस कोठडी मागण्यात आली. बचावपक्षातर्फे ॲड. लुबेश मेश्राम यांनी पीसीआरला विरोध केला.

न्यायालयाने दोन्ही पक्षांची बाजू ऐकल्यानंतर आरोपींना ७ दिवसांच्या पोलिस कोठडीत रवानगी केली. ही कारवाई डीसीपी चिन्मय पंडित आणि एसीपी रोशन पंडित यांच्या मार्गदर्शनात पोनि नंदा मनगटे, ललिता तोडासे, सपोनि गजानन चांबारे, पोहवा राजेंद्र अटकले, ज्ञानेश्वर ढोके, मनीष पराये, सुनील वाकडे, सुधीर तिवारी, शरीफ शेख, मनीष रामटेके, चेतन गेडाम, आरती चव्हाण, प्रभा खानजोडे, शुभांगी दातिर, पल्लवी वंजारी, प्रतीमा मेश्राम आणि वर्षा हटवार यांनी केली.

## क्राईम कॉर्नर

### २४१३ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर, (क्राईम रिपोर्टर):** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण २४१३ वाहन चालकांवर कारवाई करून २,६१,५०० रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मुंबई दारूबंदी कायद्यान्वये ८ प्रकरणात ८ आरोपींना अटक करून १,१४,९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर जुगार कायद्यान्वये ४ प्रकरणात ६ आरोपींना अटक करून १,७७,०५० रुपयांचा माल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

### दोघांची अल्पवयीनला मारहाण

**नागपूर, (क्राईम रिपोर्टर):**. वस्तीत राहणाऱ्या तरुणाने साथीदारासह मिळून कोणतेही कारण नसताना वाद घालून एका अल्पवयीन मुलाला जबर मारहाण करून जखमी केले. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत बेझनबाग परिसरात घडली. पोलिसांनी जखमी अक्षय विरेंद्र मेश्राम (१७) च्या तक्रारीवरून सुमित देशकर (२४) आणि त्याच्या साथीदारावर गुन्हा नोंदविला आहे.

अक्षय आणि सुमित एकाच वस्तीत राहतात. रविवारी रात्री २ वाजताच्या सुमारास अक्षय घराजवळ फिरत होता. दरम्यान दोन्ही आरोपी तेथे आले. विनाकारण वाद घालून अक्षयला मारहाण केली. विरोध केला असता डोक्यावर वीट मारून जखमी केले. अक्षयने घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण : आरोपी गजाआड

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** झाडावरून आंबे आणि चिंच तोडण्याच्या बहाण्याने एक विकृत तरुण अल्पवयीन मुलांना हेरुन महाराजबाग परिसरात घेऊन जात होता. निर्जनस्थळावर गेल्यानंतर तो त्यांच्यावर अनैसर्गिक अत्याचार करायचा. त्यानंतर याबाबत कुठेही वाच्यता न करण्याबाबत धमकावत होता. अशाप्रकारे त्याने एक-दोन नाहीतर ६ मुलांचे अनैसर्गिकरित्या लैंगिक शोषण केले. मात्र एका मुलाने बंड पुकारात त्याच्या कुकृत्याचा पाढा वाचला आणि त्याचे बिंग फुटले. पोलिसांनी ९ वर्षीय मुलाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. ही अत्यंत संतापदायक आणि माणुसकीला काळमी फासणारी घटना सीताबर्डीच्या वसंतराव नाईक झोपडपट्टीत उघडकीस आली आहे. मयूर मोडक (२८) रा. गाडगेनगर, धरमपेठ असे आरोपीचे नाव आहे. आरोपी मयूर विरुद्ध संपूर्ण परिसरात तीव्र संताप आहे. मयूरच्या विकृतीला बळी पडलेली मुले ही ७ ते ११ वर्ष वयोगटातील आहेत.

### अनेक महिन्यांपासून येत होता परिसरात

पीडित मुलाचे वडील एका बंगल्यात कामाला आहेत. आईही कामावर जाते. वसंतराव नाईक झोपडपट्टीत बहुतांश दाम्पत्य दोन वेळेच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी मुलांना घरी ठेवून कामावर निघून जातात आणि सायंकाळीच घरी परततात. मयूरने हिच गोष्ट हेरली. तो परिसरात सायकलने येत होता आणि मुलांसोबत खेळत होता. मुलांना जवळ बोलावण्यासाठी तो मोबाईलही देत होता. अनेक महिन्यांपासून तो वस्तीत येत होता. त्यामुळे कोणालाही संशय आला नाही. तो आळी-पाळीमुलांना आंबे आणि चिंच तोडण्याच्या बहाण्याने महाराजबाग परिसरात घेऊन जायचा. परिसरात एक पडके घर आहे. मुलांना तेथे घेऊन जात तो त्यांच्याशी अनैसर्गिक अत्याचार करीत होता. अनेकदा तर तो २-३मुलांना एकत्र सोबत घेऊन गेला होता. मयूरच्या भीतीमुळे सर्व मुले चुपचाप त्याचा अत्याचार सहन करीत होते.

### वडिलांसमोर मांडली कैफियत

पीडित बालकाचेही तो गत एक महिन्यापासून शोषण करीत होता. अखेर तो मयूरच्या छळाला कंटाळला. २७ मे रोजी वडील घरी परतले असता तो रडताना दिसला. विचारपूस केली असता मुलाने वडिलांना मयूरकडून सुरू असलेल्या छडाची माहिती दिली. इतकेच नाहीतर मयूरकडून शोषण सुरू असलेल्या इतर मुलांचीही नावे दिली. वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी सर्व मुलांच्या आई-वडिलांचीभेट घेऊन मयूरच्या अत्याचाराची माहिती दिली. आपल्या मुलांना विश्वासात घेऊन विचारपूस करण्यास सांगितले. इतर पाच मुलांनीही मयूरच्या अत्याचाराचा पाढा वाचला. मुलांचे पालक आणि परिसरातील नागरिकांमध्ये मयूरविरुद्ध संतापाची लाट उसळली. सर्वांना मयूरची प्रतीक्षा होती, मात्र तो दोन दिवस आलाच नाही. अखेर प्रकरणाची तक्रार सीताबर्डी पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी मयूरवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. सध्यातोफरारअसूनपोलिसत्याचाशोध घेत आहेत.

## बनावट कागदपत्रांद्वारे भूखंडाची विक्री

**नागपूर :** बनावट कागदपत्रांद्वारे ३ आरोपींनी भूखंडाची विक्री केल्याचे प्रकरण वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आले आहे. पोलिसांनी संजय भगवान ठाकूर (४४) रा. श्रीनगर, नंदनवनच्या तक्रारीवरून तीन आरोपींवर गुन्हा नोंदविला आहे. बबन नामदेव राखुंडे (६५) रा. एलआयजी क्वॉर्टर, अमजद जान बब्बू जान ताजी (४५) रा. मोठा ताजबाग आणि अश्फाक खान अलवर खान (४५) रा. रोशनबाग, खरबी अशी आरोपींची नावे आहेत. अमजद आणि अश्फाक दलाल आहेत आणि प्रॉपर्टी डीलिंगचे काम करतात. संजय यांना भूखंड खरेदी करायचा होता. आरोपींनी संजय यांना मौजा तरोडी खुर्द अंतर्गत येणाऱ्या बिडगाव परिसरात आदिवासी बेघर नागरिक सेवा संस्थेच्या लेआऊटमधील ६०० वर्ग फुटाचा भूखंड दाखविला. हा भूखंड आरोपींनी आधीच दुसऱ्याला विकला होता. त्यानंतरही त्यांनी बोगस कागदपत्रांद्वारे संजय यांच्याशी भूखंडाचा सौदा केला. त्यांच्याकडून ५.३५ लाख रुपये घेतले आणि रजिस्ट्री करून दिली. काही दिवसांनी संजय यांना आरोपींनी तो भूखंड आधीच दुसऱ्यालाही विकल्याची माहिती मिळाली. फसवणूक झाल्याचे समजताच त्यांनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## शरद जोशी के व्यंग्य के रंग कार्यक्रम

**नागपूर.** लोहिया अध्ययन केंद्राच्या वतीने प्रसिद्ध व्यंग चित्रकार शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त शरद जोशी के व्यंग के रंग कार्यक्रमाचे आयोजन केंद्राचे मधु लिमये स्मृती सभागृहात करण्यात आले. कार्यक्रमाची अध्यक्षता डॉ. ओमप्रकाश मिश्रा यांनी केली. याप्रसंगी केंद्राचे सचिव सुनील पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यकार नरेंद्र परिहा यांनी शरद जोशी यांच्या व्यंग हम जिनके मामा है, डॉ. जयप्रकाश यांनी जादू की सरकार, सरकार का जादू कृष्णकुमार द्विवेदी यांनी रेलयात्रा व टीकाराम साहू यांनी अतिथी तुम कब आओगे व्यंग्य सादर केले. आभार तेजवीय सिंह यांनी मानले. कार्यक्रमात अमित प्रभाकर, डॉ. शशिवर्धन शर्मा शैलेश, डॉ. अनिल त्रिपाठी, अजय पांडे, विजय श्रीवास्तव, नरेश निमजे, अरूण बुदेला, हर्षवर्धन बुदेला, कुमार बुदेला आदी उपस्थित होते.

## ११वीच्या नोंदणीला सुरुवात, पहिल्याच दिवशी ११३१ अर्ज

**नागपूर.** ११वी प्रवेशासाठी सोमवार ३० मे पासून नोंदणी झाली. केंद्रीय प्रवेश समितीच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, पहिल्या दिवशी ११३१ विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. यात राज्य मंडळाच्या १०४०, सीबीएसईच्या ८१, आयसीएसईच्या ४, आयबीच्या १ व इतर बोर्डाच्या ५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना १०वीच्या निकालापर्यंत नोंदणी करता येणार आहे. त्यापूर्वी २३ ते २७ मे पर्यंत नोंदणीचा सराव करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळली होती. नागपूरसह, पुणे, चिंचवड, अमरावती, नाशिक, मुंबई येथे ११वीचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पद्धतीने केले जातात. १०वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्जाच्या पहिल्या टप्प्या भरुन घेण्यात येतो. निकाल जाहीर झाल्यावर कागदपत्रांची पडताळणी करायची आहे, त्यानंतर मेरीट लिस्ट जाहीर केली जाणार आहे.

## ४ ला सारेगामा कारवां

**नागपूर.** श्रीसाई बहुउद्देशीय संस्थातर्फे आयोजित व स्वरमालाच्या संयुक्त विद्यमानात सारेगामा कारवा जुन्या हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम ४ जून रोजी सायंकाळी ४.३० वाजता सुरेशभट सभागृह, रेशिमबाग येथे आयोजित केला जात आहे. याची निर्मीती श्वेता खिची व संकल्पना राजेश आनंद यांची आहे. याप्रसंगी गायक राजेश खिची, आनंद फडणवीस, श्रेया टांकसाळे, डॉ. संजय गुज्जनवार, सुभाष पडोळे सादर करतील.

### कालचा शुभांक

| | | |
|---|---|---|
| मणिपूर | 260-8 | 678-1 |
| कल्याण | 357-5 | 446-4 |
| राजधानी | 190-0 | - |
| कुबेर | 590-4 | - |
| खजाना डे | - | - |
| नागपूर मार्निंग | - | - |

# वह्या, नोटबुकच्या किंमती वाढल्या

**नागपूर.** मागील २ वर्षे कोरोनामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण सुरू होते. कोरोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात आल्यावर पुन्हा शैक्षणिक वर्षे जूनमध्ये सुरू होणार आहे. मात्र यावेळी पालकांच्या खिशावर जादाचा खर्च पडणार असल्याचे चित्र दिसू लागले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत शालेय साहित्यात तब्बल ३० ते ४० टक्के वाढ झाली आहे. यामुळे पाल्यांसाठी शालेय वस्तू खरेदी करताना पालकांना थोडा विचार करावा लागणार आहे.

या वर्षांत आयातीत वस्तू माहागल्या. कच्च्या मालाच्या किमती वाढल्या. कागदाचे दर वाढल्याने वह्यांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. शिक्षण साहित्यात झालेल्या वाढीमुळे पालकांना महागाईचा सामना करावा लागणार आहे. तथापि, बाजारात नवनवीन नोटबुकसह विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य विक्रीसाठी दाखल झाले आहे. शालेय साहित्याबरोबरच मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे साहित्य देखील दाखल झाले आहे.

### शालेय साहित्याचे असे आहेत दर (डझनानुसार)

१०० पेजेस वह्या : १३२-२१रु.
२०० पेजेस वह्या : २१६-३६रु.
लॉग बुक १०० पेजेस : २१६-३०रु.
लॉग बुक २०० पेजेस : २४०-४०रु.
ए फोर साईज : ३००-८०रु.
कंपासपेटी : ५०-३०रु.



### महाग झाले तरी घ्यावेच लागणार

ग्रामीण भागातील आठवडे बाजारामध्येही शैक्षणिक साहित्य विक्रीस असून, पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विक्रीत विविध कंपन्यांची रस्सीखेच असून दर्जेदार सहित्यास ग्राहक आकर्षित होत असल्याचे चित्र बाजारात आहे. नोटबुक कंपासपेटी, नोट पॅड, लहान मुलांना वापरात असलेली पाटी, पेन, दप्तर, अंकलिपी या वस्तूंना वाढती मागणी आहे. जरी शाळेत पुस्तके मोफत मिळणार असली तरी वह्यांचे नानाविध प्रकार बाजारात आले आहेत. बदलत्या काळानुसार मुलांना आवडणाऱ्या वस्तू देखील महाग झाल्या आहेत. मात्र, मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून साहित्य घ्यावे लागणार असल्याचे पालकांनी सांगितले. अभिनेता, निसर्गरम्य चित्र, फुले पक्षी, प्राणी, कार्टुन या छायाचित्रांसह बहुरंगी वह्यांना मुलांची प्रत्येकवर्षी अधिक पसंती असते.


## G. G. DANDEKAR MACHINE WORKS LIMITED

**Regd. Office:** 211/A, MIDC, Butibori Industrial Area, Village Kinhi, Tal. Hingana, Dist. Nagpur-441122
**Tel.:** (07103) 295109; **CIN:** L70100MH1938PLC002869 **Email:** cs@ggdandekar.com; **Website:** www.ggdandekar.com

**Extract of Standalone and Consolidated Audited Financial Results for the quarter and year ended 31st March 2022**

(Rs. in Lakhs except EPS)

| Sl. No. | Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ending 31.03.2022 (Audited) | Year ending 31.03.2022 (Audited) | Quarter ended 31.03.2021 (Audited) | Quarter ending 31.03.2021 (Audited) | Year ending 31.03.2022 (Audited) | Quarter ended 31.03.2021 (Audited) |
| 1. | Total income from Operations | 54.68 | 2,138.44 | 186.38 | 54.68 | 2,138.44 | 186.38 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | -56.52 | 1,720.84 | -65.67 | -56.52 | 1,720.84 | -65.67 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | -56.52 | 1,720.84 | -65.67 | -56.52 | 1,720.84 | -65.67 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after Tax (after Exceptional and/or Extraordinary items) (Consolidated includes share of profit in associate company) | 256.30 | 1,645.31 | -70.46 | 256.33 | 1,648.15 | 12.68 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 55.72 | 1,547.34 | 131.79 | 55.75 | 1,550.19 | 214.94 |
| 6. | Equity Share Capital | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 | 47.61 |
| 7. | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet | - | 5,425.05 | - | - | 5,551.24 | - |
| 8. | Earnings Per Share (of Rs. 1/- each) (Not annualized) – | | | | | | |
| | 1. Basic: | 5.38 | 34.56 | -1.48 | 5.38 | 34.62 | 0.27 |
| | 2. Diluted: | 5.38 | 34.56 | -1.48 | 5.38 | 34.62 | 0.27 |

**Note:**
(a) The above results have been reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors in their respective meetings held on May 30, 2022.
(b) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results is available on the website of the Stock Exchange at www.bseindia.com & at Company's website: www.ggdandekar.com.

For and on Behalf of the Board
Sd/-
Pranav Deshpande
Additional (Executive) Director (DIN: 06467549)

**Place:** Pune
**Date:** May 30, 2022



## कार्यालय नगर परिषद गोंदिया

### कचरा संकलन शुल्क/उपयोगकर्ता शुल्क संदर्भात जाहीर सुचना

नगर परिषद गोंदिया क्षेत्रातील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब मध्ये दि १ जुलै २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या नगर परिषद/नगर पंचायती यांच्यासाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी संदर्भात अधिसुचनेमध्ये जाहीर करण्यात आलेल्या उपयोगकर्ता शुल्काची म्हणजे घनकचरा संकलन, वाहतुक, प्रक्रिया व विल्हेवाट लावण्याची सेवा देण्याचा खर्च पुर्णपणे किंवा अंशत: वसुल करण्यापोटी कचरा जनकावर नियम २ मध्ये नमुद स्थानिक संस्था किंवा अन्य अस्तित्वाने निर्धारित केलेले शुल्काची अनुसुची १ भाग अ नुसार अ वर्ग नगर परिषदेसाठी देण्यात आलेल्या आलेल्या दरानुसार मालमत्ता करासोबत वार्षिक शुल्काची आकारणी करून दि. १ जुलै २०२२ पासुन उपयोगकर्ता शुल्काची नगर परिषद गोंदिया येथील कर विभागामार्फत करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

घरे व आस्थापनांच्या मधुन कचरा संकलन करण्यासाठीचे दर/उपयोगकर्ता शुल्क खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्र. | वर्गवारी | नगर परिषद अ वर्ग मासिक शुल्क | वार्षिक आकारणी |
|---|---|---|---|
| | घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षा कमी | | |
| १ | प्रति घर | ३० | ३६०/- |
| | व्यवसायिक आस्थापना | | |
| २ | दुकाने, दवाखाने इत्यादी | ४५ | ५४०/- |
| ३ | शोरूम (उपकरणे/फर्निचर/ऑटोमोबाई/इलेक्ट्रॉनिक्स इ.) | ८० | ९६०/- |
| ४ | गोदामे | ८० | ९६०/- |
| ५ | उपहारगृहे व हॉटेल | ८० | ९६०/- |
| ६ | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | १०० | १२०० |
| | रूग्णालये | | |
| ७ | पन्नास खाटांपेक्षा कमी | ८० | ९६०/- |
| ८ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | १२० | १३४०/- |
| | संस्था | | |
| ९ | शैक्षणिक संस्था, वसतिगृहे | ६० | ७२०/- |
| १० | धार्मिक संस्था | ६० | ७२०/- |
| ११ | शासकीय/निमशासकीय कार्यालये | ६० | ७२०/- |
| १२ | विवाह कार्यलय/मनोरंजन सभागृहे/एक पडदा चित्रपटगृहे | ५०० | ६०००/- |
| १३ | खरेदी केंद्रे/बहुपडदा चित्रपटगृहे | १००० | १२०००/- |
| १४ | फेरीवाले | ३० | ३६०/- |
| १५ | पर्यटन स्थळी घोडयाची लीद | ३०० | ३६००/- |
| १६ | हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा/सत्संग/खाद्य महोत्सव/फटाक्याचे दुकान | नगर परिषद गोंदिया मार्फत एक वेळ शुल्क निर्धारित करण्यात येईल. | |

करणकुमार चव्हाण
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद गोंदिया

